**विशेष सत्र खटला क्र.३६/२०२१.**
**(नियमित जामीन मिळण्यासाठीचा अर्ज.)**
**सरकार वि. संजय नवलकार.**
**गुन्हानोंद क्र.३२३/२०२१, तेल्हारा पोलीसठाणे.**
**गुन्हे : भारतीय दंड विधान कलम ३०२, ३२३, ५०६ आणि अनुसूचित जातीजमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम कलम ३ (२) (व्हीए) अन्वये.**
**सी.एन.आर.क्र. एमएचके.०५—०००६२२—२०२१.**

..................................................................................................

**निशाणी क्र.११ खालील आदेश.**
**(दिनांक २१.११.२०२२.)**

सदरचा आदेश मी या अर्जालगतच पारित करीत असल्यामुळे त्यातील मजकूर नमूद करण्याचे कारण नाही.

२. सदर अर्जास सरकारपक्षाने वादाचे म्हणणे निशाणी क्र.१२ प्रमाणे दिले आहे. त्याचप्रमाणे, फिर्यादीने देखील तिचे वादाचे म्हणणे निशाणी क्र.१४ प्रमाणे दिले आहे. वादाच्या त्या दोन्ही म्हणण्यांतील मजकूर खालीलप्रमाणे.

आरोपीविरुद्धचे गुन्हे अतिशय गंभीर स्वरुपाचे आहेत. आरोपीने अतिशय क्रूरपणे आठ वर्षांच्या बालकाचा खून केला आहे. आरोपीस जामीन दिल्यास तो फिर्यादीवर आणि तिच्या मुलीवर पुन्हा हल्ला करु शकतो. त्यांच्यावर दाबदबाव आणू शकतो. आरोपी, फिर्यादी, साक्षीदार हे एकाच घरात/एकाच परिसरात राहतात. त्यामुळे आरोपीला जामीन दिल्यास फिर्यादीच्या आणि साक्षीदारांच्या जीवाला धोका निर्माण होईल. समाजात चुकीचा संदेश जाईल. तो फरार होईल. आरोपीविरुद्ध समाजात घृणा आहे. या आरोपीने फिर्यादीच्या मुलाचा खून केल्याचे तपासातून निष्पन्न होते. म्हणून हा जामीन अर्ज फेटाळावा, अशी सरकारपक्षाची विनंती आहे.

३. वरीलप्रमाणे अर्ज पाहिला. सरकारपक्षाचे वादाचे म्हणणे निशाणी क्र.१२ आणि फिर्यादीचेही वादाचे म्हणणे निशाणी क्र.१४ पाहिले. संपूर्ण अभिलेख पाहिला. उभयपक्षांच्या विद्वान वकिलांचा प्रदीर्घ युक्तिवाद ऐकला.

**४.** सदर प्रकरणी आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल झाले असल्याचा अर्जदार आरोपीच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद योग्य आहे. मात्र, तेवढ्यामुळे हा जामीन अर्ज मंजूर करणे न्यायोचित नाही. यातील फिर्यादी ही गोंड आदिवासी महिला आहे. 'ती तिच्या दहा वर्षांची मुलगी श्रावणी आणि आठ वर्षांचा मुलगा वेदांत यांच्यासोबत एकटीच राहत असतांना तिच्या परिस्थितीचा फायदा घेऊन आरोपीने तिला स्वत:च्या गांवी आणले आणि त्यानंतर घटनेच्या दिवशी, वेळी व ठिकणी फिर्यादीच्या मुलाने माठात उष्टा पेला बुडविला, या कारणावरुन लोखंडी फुंकणीने, लाकडाने बेदम मारहाण करुन, पाय पकडून, त्याला उचलून त्याचे डोके जमिनीवर आपटले आणि त्यानंतर न्हाणीघरात नेऊन तेथील भलामोठा दगड त्या मुलाच्या छातीवर ठेवला. त्या मुलाची लहानगी बहीण वाचवायला आली असता, आरोपीने तिलाही काठीने मारले', — असे आरोपीविरुद्ध एकूण आरोप आहेत.

**५.** गुन्ह्यांची घटना पाहता, आरोपीचे वर्तन अत्यंत विकृत आणि क्रूर पद्धतीचे असल्याचे निष्पन्न होते. लहान मुलाचा किंवा मुलीचा देखील विचार अर्जदार आरोपीने गुन्हे करतांना केल्याचे दिसत नाही. केवळ पाण्याच्या माठात उष्टा पेला बुडविणाऱ्या मुलास रागावणे/समजावून सांगणे पुरेसे असतांना त्या मुलाला लोखंडी फुंकणीने, इंधनाच्या लाकडाने मारले आणि त्या लहानग्या मुलाचे दोन्ही पाय धरुन त्याला वरुन खाली जमिनीवर डोक्यावर आपटले, हे आरोपीचे कृत्य त्याच्या मनस्थितीची पूर्ण कल्पना देणारे आहे. मधे येणाऱ्या छोट्या मुलीस देखील आरोपीने लाकडी काठीने मारल्याचेही तिचे म्हणणे आहे. शिवाय, 'तू कोणाला सांगशील तर, तुलाही मारुन टाकेल', अशीही धमकी तिला अर्जदार आरोपीने दिल्याचे स्पष्ट होते.

**६.** यातील फिर्यादी आता तिच्या एकट्या मुलीसह एकटीच राहत आहे. या परिस्थितीत आरोपीस जामीन दिल्यास खचितच फिर्यादीच्या आणि तिच्या लहान मुलीच्या जीवास मोठा धोका निर्माण होऊ शकतो. आरोपीने केलेल्या गुन्ह्यांस प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या तपासटिपणांची जोड आहे. न्यायिक वैद्यकीय प्रमाणपत्रांची जोड आहे. आरोपीचे गुन्हे आणि त्यातील क्रौर्य पाहता, त्यास जामिनावर सोडल्यास फिर्यादीच्या आणि तिच्या लहान मुलीच्या जीवाचेही बरेवाईट करण्यास आरोपी मागेपुढे पाहणार नाही. कारण, गुन्ह्यांच्या घटनेच्या दिवशी, वेळी

व ठिकाणी लहानग्या भावाला वाचवायला मध्ये पडलेल्या लहान बहिणीला काठीने मारतांना आरोपीने तिच्या तोंडावर, भुजेवर, पायांवर मोठमोठ्या मापाच्या जखमा केल्याचे त्या मुलीच्या न्यायिक वैद्यकीय प्रमाणपत्रावरुन निष्पन्न होते. त्यामुळे आरोपीस जामीन देण्याजोगी परिस्थिती या प्रकरणात नाही, असा माझा स्पष्ट निष्कर्ष आहे. म्हणून हा जामीन अर्ज फेटाळला जाण्यास पात्र आहे आणि फेटाळण्यात येत आहे.

(चकोर श्रीकृष्ण बाविस्कर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
अकोट, जि. अकोला.

दिनांक : २१.११.२०२२.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | Anil D. Bais, Stenographer Grade-I. |
| Court Name | : | District Judge-1 & A.S.J. Akot. |
| Date of Dictation | : | 21.11.2022. |
| Signed by Presiding Officer on | : | 21.11.2022. |
| Uploaded on | : | 21.11.2022. |

…...